


दैनिक

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे    Email : newsaksharaj2021@gmail.com




● वर्ष ०३ रे ● अंक ९५ वा ● पाने ०४ ● किंमत : ३ रुपये | ठाणे, सोमवार, दि.२६ जानेवारी २०२६ | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023

● YEAR : 03 ● ISSUE : 95 ● PAGES : 04 ● PRICE RS. : 03 | THANE, Monday, 26 January 2026 | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023

## महाराष्ट्रातील ४ दिग्गजांना पद्म पुरस्कार

## देशातील ४५ जणांचा होणार सन्मान

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, नवी दिल्ली :** केंद्र सरकारकडून प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातील दिग्गजांना पद्म पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. केंद्र सरकारकडून एकूण ४५ दिग्गजांसाठी पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये ४ महाराष्ट्रातील दिग्गज व्यक्तींचा समावेश आहे. या सर्व दिग्गजांना प्रजासत्ताक दिनी आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्म पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील उत्कृष्ट तारपावादक भिकल्या लाडक्या धिंडा यांना पद्म पुरस्काराची घोषणा झाली आहे. यासोबतच महाराष्ट्रातील लोकप्रिय तमाशा कलाकार रघुवीर खेडकर यांनादेखील पद्म पुरस्कार घोषित झाला आहे. कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे श्रीरंग देवबा लाड यांना पद्म पुरस्कार घोषित झाला आहे. तसेच प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. आर्मिडा फर्नांडिस यांनादेखील पद्म पुरस्काराने गौरवण्यात येणार आहेत.



**‘या’ दिग्गजांना जाहीर झाले पद्म पुरस्कार, वाचा संपूर्ण यादी**

भगवानदास रायकर (मध्य प्रदेश), भिकल्या लाडक्या धिंडा (महाराष्ट्र)
ब्रिजलाल भट्ट (जम्मू आणि काश्मीर), चरण हेमब्रम (ओडिशा)
चिरंजी लाल यादव (उत्तर प्रदेश), डॉ. पद्मा गुरमेट (जम्मू आणि काश्मीर)
कोल्लक्काइल देवकी अम्मा जी (केरळ), महेंद्र कुमार मिश्रा (ओडिशा)
नरेश चंद्र देव वर्मा (त्रिपुरा), ओथुवर तिरुथनी (तामिळनाडू)
रघुपत सिंग (उत्तर प्रदेश), रघुवीर खेडकर (महाराष्ट्र)
राजस्थानपती कलिअप्पा गौंडर (तामिळनाडू), सांग्युसांग एस. पोंगेनर (नागालँड),
श्रीरंग देवबा लाड (महाराष्ट्र), तिरुवरूर बख्तवासलम (तामिळनाडू)
अंके गौडा (कर्नाटक), डॉ. आर्मिडा फर्नांडिस (महाराष्ट्र)
डॉ. श्याम सुंदर (उत्तर प्रदेश), गफ्फारुद्दीन मेवाती (राजस्थान)
खेम राज सुंदरियाल (हरियाणा), मीर हाजीभाई कासंबाई (गुजरात)
मोहन नगर (मध्य प्रदेश), नीलेश मांडलेवाला (गुजरात)
आर अँड एस गोडबोले (छत्तीसगड), राम रेड्डी मामिदी (तेलंगणा)
सिमांचल पात्रो (ओडिशा), सुरेश हनगवाडी (कर्नाटक)
तेची गुबिन (अरुणाचल प्रदेश), युनाम जात्रा सिंग (मणिपूर)
बुधरी थाठी (छत्तीसगड), डॉ. कुमारसामी थंगराज (तेलंगणा)
डॉ. पुननियामूर्ती नटेसन (तामिळनाडू), हेले वॉर (मेघालय)
इंद्रजित सिंग सिद्धू (चंदीगड), के. पंजनिवेल (पुडुचेरी)
कैलास चंद्र पंत (मध्य प्रदेश), नुरुद्दीन अहमद (आसाम)
पोकिला लेकटेपी (आसाम), आर. कृष्णन (तामिळनाडू)
एस जी सुशीलम्मा (कर्नाटक), तागा राम भील (राजस्थान)
विश्व बंधू (बिहार), धर्मिकलाल चुनीलाल पंड्या (गुजरात)
शफी शौक (जम्मू आणि काश्मीर)

**भिकल्या लाडक्या धिंडा कोण आहेत?**

भिकल्या लाडक्या धिंडा हे पालघर जिल्ह्यातील वलवंडे गावचे रहिवासी आहेत. ते ८९ वर्षीय आहेत. ते आदिवासी तारपा वादक आहेत. ते अतिशय उत्कृष्ट तारपावादन करतात. तसेच ते तारपाची निर्मिती देखील करतात. ते तरुणांना तारपावादन शिकवतात. तारपा हे बांबू आणि सुक्या भोपळ्यापासून बनवले जाणारे पारंपरिक वाद्य आहे. ते जवळपास ९ ते १० फूट लांबीचे असते. भिकल्या लडक्या धिंडा यांनी आपलं संपूर्ण आयुष्य आदिवासी संस्कृतीचे जतन आणि संवर्धनासाठी व्यथित केलं. त्यामुळे त्यांच्या कार्याचा गौरव आता सर्वोच्च पुरस्काराने करण्यात येणार आहे.

**रघुवीर खेडकर कोण आहेत?**

रघुवीर खेडकर हे प्रसिद्ध तमाशा कलावंत आहेत. ते गेल्या ४० ते ४५ वर्षांपासून तमाशा क्षेत्रात कार्यरत आहेत. तमाशा संस्कृती टिकवणं आणि ती राज्याबाहेर नेण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे त्यांना यावर्षी पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात येत आहे. रघुवीर खेडकर हे तमाशातील सोंगाड्या या भूमिकेसाठी लोकप्रिय आहेत. त्यांना त्यांच्या योगदानासाठी तमाशा महर्षी म्हणून देखील ओळखलं जातं. विशेष म्हणजे डॉ. जब्बार पटेल यांनी लिहिलेला 'एक होता विदूषक' हा चित्रपट रघुनाथ खेडकर यांना डोळ्यांसमोर ठेवून बनवण्यात आल्याचं मानलं जात. रघुवीर खेडकर हे मूळच्या अहिल्यानगर जिल्ह्याचे आहेत. प्रसिद्ध तमाशा सम्राज्ञी कांताबाई सातारकर यांचे ते पुत्र आहेत. रंगभूमीची सेवा करण्याचा वारसा रघुवीर खेडकर यांना आईपासून मिळाला. हा वारसा त्यांनी समर्थपणे जपला देखील आहे. त्यांच्या नेतृत्वातील तमाशा मंडळ रघुवीर खेडकर तमाशा मंडळ हे लोकप्रिय आहे.

**श्रीरंग देवबा लाड कोण आहेत?**

परभणी जिल्ह्यातील माळसोन्नाचे श्रीरंग देवबा लाड यांना कृषी क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानासाठी त्यांना पद्म पुरस्कार जाहीर झाला आहे. ते कापूस तंत्रज्ञानाचे जनक मानले जातात. तसेच शेतकरी-केंद्रीत कृषी नवप्रवर्तनाचे प्रेरक, स्वदेशी पशुधन संवर्धनाचे आदर्श मार्गदर्शक, ग्रामीण विकास, शाश्वत शेती यासाठी त्यांचं मोठं योगदान आहे. त्यांचं सामाजिक कार्यदेखील तितकेच मोठं देखील आहे. त्यांना याआधी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाकडून डॉक्टर ऑफ सायन्स (मानद) पदवी प्रदान करण्यात आली आहे. यासोबतच अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आलं आहे.

**डॉ. आर्मिडा फर्नांडीस कोण आहेत?**

डॉ. आर्मिडा फर्नांडीस यांचं देखील समाजासाठी मोठं योगदान आहे. आर्मिडा या मुंबईतील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ आणि नवजात शिशुतज्ज्ञ आहेत. भारतीय नवजात शिशु आरोग्य सेवेत त्यांचं खूप मोठं योगदान आहे. त्यांनी १९८९ मध्ये आशिया खंडातील पहिली दूध बँकेची स्थापना केली होती. नवजात शिशु मृत्यू दर कमी करण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. त्यामध्ये त्यांना यश देखील आलं. त्यांनी मुंबईतील शीव रुग्णालयात २५ वर्षांपेक्षा जास्त काळ बालरोग विभाग प्रमुख आणि डीन म्हणून काम केले आहे. यासोबतच २००० पेक्षा जास्त परिचारिका आणि डॉक्टरांना प्रशिक्षण दिलं आहे. विशेष म्हणजे निवृत्तीनंतर त्यांनी SNEHA संस्थेची स्थापना केली. ही संस्था मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या महिला आणि मुलांच्या आरोग्यासाठी काम करते. त्यांच्या आरोग्य क्षेत्रातील या अफाट योगदानासाठी त्यांना केंद्र सरकारकडून सर्वोच्च मानला जाणाऱ्या पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे.

## मुंबई महापालिकेत विरोधकांना धक्का देण्यासाठी, भाजपची नवी खेळी?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, मुंबई :** मुंबई महापालिकेत बहुमताचा आकडा गाठणाऱ्या महायुतीतील भाजप आणि शिवसेना यांच्याकडून २७ जानेवारी रोजी गट नोंदणी केली जाणार असल्याचे कळते. मात्र, दोन्ही पक्षांच्या वेगवेगळ्या गटाची नोंदणी न करता महायुती म्हणून एकच गटाची नोंदणी करण्याबाबतची चाचपणी सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोस दौऱ्यावरून परतल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चेनंतरच याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. भाजपने याबाबत दुजोरा दिला असला तरी शिवसेनेकडून मौन बाळगण्यात आले आहे. महापालिकेत भाजपचे ८९ तर शिवसेनेचे २९ असे ११८ नगरसवेकांचे संख्याबळ आहे. मात्र, अजूनही दोन्ही पक्षांनी कोकण भवन येथे गट नोंदणी केलेली नाही. परिणामी ३१ जानेवारी रोजी होणारी महापौर निवडणूक लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. दोन्ही पक्षांनी गट नोंदणी न केल्याने राजकीय वर्तुळात तर्क-वितर्क लढविले जात आहेत. अखेरीस गट नोंदणीसाठी २७ जानेवारीचा मुहूर्त निश्चित करण्यात आल्याचे समजते. मुख्यमंत्री आज, २५ जानेवारीला दावोस दौऱ्यावरून परतणार आहेत. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी ते महापौरपदासंदर्भात चर्चा करतील, त्याचवेळी एकच गट नोंदणी करण्यासंदर्भातही या बैठकीत चर्चा होईल, अशी माहिती पक्ष सूत्रांकडून देण्यात आली.

महानगरपालिकेत स्थायी समिती, शिक्षण समिती, आरोग्य समितीसह इतर अनेक समित्या कार्यरत असतात. या समितीमध्ये पक्षांच्या संख्याबळानुसार सदस्यांची निवड केली जाते. मुंबईत भाजप आणि शिवसेनेने वेगवेगळ्या गटाची नोंदणी केल्यास सदस्य संख्येवर त्याचा परिणाम होऊ शकतो. परिणामी महायुती म्हणून एकच गट नोंदणी केल्यास समितीमध्ये सदस्य संख्या वाढण्याची शक्यता असल्याने त्यासंदर्भातील चाचपणी दोन्ही पक्षांकडून सुरु असल्याचे कळते.

**शिवसेनेकडून दुजोरा नाही !**

एकच गट नोंदणी करण्यासंदर्भात शिवसेनेच्या नेत्यांकडून कोणत्याही प्रकारचा दुजोरा देण्यात आलेला नाही. एकीकडे महायुतीचे संख्याबळ ११८ इतके आहे. तर विरोधकांचे संख्याबळही १००च्या घरात आहे. परिणामी समित्यांमध्ये विरोधकांनाही मोठ्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे एखाद्या प्रस्तावावर अंतिम निर्णय घेताना भाजपची दमछाक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे इतर पक्षाचा पाठिंबा मिळावा याकरिता प्रयत्न सुरु असल्याने गट नोदंणीकरिता विलंब लागत असल्याची माहिती शिवसेनेतील ज्येष्ठ नेत्यांकडून देण्यात आली.




## साताऱ्यातील २७ वर्षीय तरुण अचानक गायब;

## ८ दिवसांनी पुण्यातील लॉजमध्ये बॉडी आढळली

**दि.२५, पुणे :** साताऱ्यातील वाई येथून आठ दिवसांपूर्वी अचानक बेपत्ता झालेल्या एका २७ वर्षीय तरुणाचा पुण्यात मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. पुणे शहरातील गजबजलेल्या कॅम्प परिसरातील एका लॉजमध्ये या तरुणाने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. पीयूष ओसवाल (रा. वाई, जि. सातारा) असे या मृत तरुणाचे नाव असून, त्याच्या मृत्यूमुळे ओसवाल कुटुंबीयांवर दुखाचा डोंगर कोसळला आहे.

पुण्यातील लष्कर (कॅम्प) परिसरातील 'मुकेश लॉज'मध्ये ही खळबळजनक घटना उघडकीस आली. बुधवारी दुपारी लॉजमधील एका बंद खोलीतून अचानक उग्र आणि असह्य दुर्गंधी येऊ लागली. यामुळे लॉजवरील कर्मचारी आणि व्यवस्थापनाला संशय आला. कर्मचाऱ्यांनी संबंधित खोलीचा दरवाजा ठोठावला, आवाज दिला, परंतु आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून लॉज प्रशासनाने तात्काळ बंडगार्डन पोलिसांना याची माहिती दिली.

माहिती मिळताच बंडगार्डन पोलीस ठाण्याचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी खोलीचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला असता, समोरचे दृश्य अंगावर काटा आणणारे होते. पीयूष ओसवाल याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आपले जीवन संपवले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतदेहाची अवस्था पाहता आणि खोलीत पसरलेली दुर्गंधी लक्षात घेता, पीयूषने सुमारे दोन ते तीन दिवसांपूर्वीच आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. मूळचा वाईचा असलेला पीयूष ओसवाल हा गेल्या आठ दिवसांपासून घरातून निघून गेला होता. तो घरी न परतल्याने आणि त्याचा कोणताही संपर्क न झाल्याने त्याच्या कुटुंबीयांनी वाई पोलीस ठाण्यात धाव घेतली होती. वाई पोलिसांनी तातडीने तो बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवून तपास सुरू केला होता. एकीकडे वाई पोलीस आणि नातेवाईक त्याचा शोध घेत असतानाच, दुसरीकडे पुण्यात त्याचा मृतदेह आढळल्याने या प्रकरणाला धक्कादायक वळण मिळाले आहे. घटनास्थळाचा पंचनामा केल्यानंतर बंडगार्डन पोलिसांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ससून रुग्णालयात पाठवला आहे. पीयूष पुण्यात कधी आला? तो या लॉजवर कधीपासून थांबला होता? आणि त्याने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले? या प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत.

याप्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. वाई पोलिसांनाही या घटनेची माहिती देण्यात आली असून, दोन्ही पोलीस ठाण्यांच्या समन्वयातून पुढील तपास केला जात आहे. तरुण वयात पीयूषने उचललेल्या या टोकाच्या पाऊलामुळे वाई परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# संपादकीय



## कहाणी लंडनच्या सायकलस्वारांची!

एके काळी 'सायकलींचे शहर' असे बिरूद मिरविणाऱ्या पुण्यातून खरे तर अशी बातमी यायला हवी होती; परंतु ती आली आहे, लंडनमधून. बातमी आहे, तेथील सायकलींच्या वापराची. 'ट्रान्स्पोर्ट फॉर लंडन'च्या (टीएफएल) अहवालानुसार, लंडनमध्ये दररोज सायकल वापरणाऱ्यांच्या सरासरी संख्येत वाढ होत असून, गेल्या २५ वर्षांतील सर्वाधिक सायकलस्वारांची संख्या गेल्या वर्षी (२०२५) नोंदवली गेली. इच्छित ठिकाणी थेट सायकलीने किंवा बसस्थानक वा मेट्रोस्थानकापर्यंत सायकलीने जाणाऱ्यांची रोजची सरासरी संख्या गेल्या वर्षी १५ लाखांवर गेली. २०२४मध्ये ही १३.३ लाख होती. सन २०००मध्ये तिथे प्रवासासाठी दररोज सायकल वापरणारे ४.७ लाख होते; २५ वर्षांत या संख्येत तिपटीहून अधिक वाढ झाली. आणखी पाच वर्षांनी २०३०मध्ये दररोजच्या सायकलस्वारांची संख्या १६ लाखांवर नेण्याचे उद्दिष्ट 'टीएफएल'चे आहे; परंतु कदाचित मुदतीच्या आधीच त्याची पूर्तता होईल.

सुमारे ९० लाख लोकसंख्येच्या लंडनमधील वाहतूक व्यवस्था सर्वांना सोयीची, कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक व्हावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू आहेत. बस आणि मेट्रो आदी सार्वजनिक वाहतूक सुविधांबरोबरच मोटारी आणि अन्य खासगी वाहनांच्या जोडीने लोकांना सहजपणे चालता यावे किंवा सायकलीवरून जाता यावे, यावर कटाक्ष आहे. त्यासाठीच तिथे पादचारी आणि सायकलस्वार यासाठी आयुक्त आहेत. विल नॉर्मन हे त्यांचे नाव. लंडनसाठीच्या सायकल धोरणामागील द्रष्टा अधिकारी अशीही त्यांची ओळख आहे. सायकल-मार्गिकांचे जाळे वाढविण्यात येत असल्याने सायकलस्वारांची संख्या वाढत असल्याचे त्यांनी एका मुलाखतीत सांगितले होते. लंडन हे सायकलींचे शहर होईल, असा आत्मविश्वासही त्यांना आहे. २०१६मध्ये लंडनमधील सायकल-मार्गिकांचे जाळे ९० किलोमीटरचे होते; आठ वर्षांत ते चौपटीने वाढून ३६० किमीहून अधिक झाले आहे. यामुळे सायकली वापरणाऱ्यांचे प्रमाणही वाढले. हे जाळे विस्तारण्याच्या जोडीने पादचाऱ्यांच्या आणि सायकलस्वारांच्या सुरक्षिततेसाठी दक्षता घेतली जात असल्याने अपघातांचे प्रमाण कमी होत असल्याचे नॉर्मन यांनी नमूद केले होते.

घराबाहेर पडून कार्यालयांत किंवा अन्य कामांच्या ठिकाणी जाण्यासाठी चालणे किंवा सायकलिंग या व्यायामाशी संबंधित गोष्टी करणाऱ्यांवर लंडनवासी भर देत असल्याकडे 'टीएफएल'चा अहवाल लक्ष वेधतो. वीस वर्षे किंवा त्याहून अधिक वय असलेल्या लंडनवासींमध्ये अशा प्रकारच्या व्यायामाद्वारे प्रवास करणाऱ्यांचे प्रमाण २०२५मध्ये ४३ टक्के होते; त्याच्या आधीच्या वर्षी हे प्रमाण ३९.६ टक्के होते. हे प्रमाण पुढील १५ वर्षांत ७० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. लंडनमधील अनेक आस्थापनांनी सायकलींवरून येणाऱ्यांसाठी प्रोत्साहनपर योजना आखल्या आहेत. सायकली भाड्याने देण्यासाठीची योजनाही तिथे गेल्या १५ वर्षांपासून कार्यक्षमतेने राबविण्यात येत आहे. उत्तम मार्गिका, चौकांमध्ये मोठ्या वाहनांसाठी वेगमर्यादा, सुरक्षाविषयक नियम यांसह भाड्याने सायकली सहज उपलब्ध होणे आणि प्रोत्साहन योजना आदींमुळे सायकलींचा वापर वाढतोय. परिणामी तेथील कार्बन उत्सर्जनाचे प्रमाणही कमी होत आहे.

या पार्श्वभूमीवर पुण्यातील (किंवा आपल्याकडील कोणत्याही शहरातील) स्थिती काय आहे? पुण्यात जेमतेम तीन टक्के लोक सायकल वापरत असून, सायकल-मार्गिकांचे जाळे वेगाने आक्रसत आहे. २०२४-२५मधील पुण्यातील सायकल ट्रॅकबाबत 'परिसर' या संस्थेने केलेल्या पाहणीनुसार, केवळ ११ टक्के सायकल ट्रॅक चांगल्या अवस्थेत आहेत. एकूण १९ रस्त्यांवरील एकत्रित अशा ३५ किमी लांबीच्या सायकल ट्रॅकच्या पाहणीतील निरीक्षणे सुखावह नाहीत. सायकली भाड्याने देण्याची योजना तर पुण्यात केव्हाच अक्षरश: 'भंगारा'त गेलेली आहे. सध्या पुण्यात 'पुणे ग्रँड चॅलेंज टूर' ही आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धा सुरू असून, त्यामुळे सायकलींचा विषय पुन्हा चर्चेत आला आहे. या निमित्ताने, लंडनचा आदर्श पुणे किंवा आपली अन्य शहरे घेऊ शकतात काय आणि त्याला पूरक धोरण नव्याने निवडून आलेले 'कारभारी' राबविणार काय, हा प्रश्न विचारायला हरकत नाही.

## ध्वज वंदन..

प्रजासत्ताकदिन येई
आनंद उरात व्यापून
दीडशे वर्षे पारतंत्र्यी
दडपण गेले ते संपून

ध्वजस्तंभ मध्यभागी
ठेवे झेंडा घडी करुन
सरसर चढवतोवरती
टोकापर्यंत रे खालून

जुनाझेंडा ब्रिटिशांचा
टाकला पार उतरून
पळाले भारत सोडून
ते इंग्रज गेले बिथरुन

तिरंगा फडके नभात
ध्वजा रोहण म्हणून
राष्ट्रगीत गाअभिमाने
नियम धोरण जाणून

ध्वजसंहिता जाणावी
समग्र नियम समजून
झेंडाउतरे सायंकाळी
सन्मान करी उमजून

प्रजासत्ताक दिवशी
झेंडा ठेवतात बांधून
ध्वजलहरे दिमाखात
दोरी खालून ओढून

दोन्ही दिस महत्वाचे
पध्दती घ्यावी पाहून
राष्ट्रीय सण साजरा
देशप्रेमा घ्यावे वाहून

**--हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# राष्ट्रध्वजाचा सन्मान राखायलाच हवा !



प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने कागदी आणि कापडी ध्वज बाजारात विक्रीसाठी आले आहेत. राष्ट्रीय सणांच्या निमित्ताने सरकारच्या वतीने 'हर घर तिरंगा मोहीम' राबवली जात असल्याने घरोघरी त्यादृष्टीने सिद्धता एक आठवडा आधीपासूनच सुरु झाली आहे. कपड्यांच्या दुकानांचे डिस्प्ले तिरंगी कापडांनी सजले आहेत. अन्य दुकानांनीही आपले देशाप्रतीचे प्रेम दर्शवण्यासाठी आणि ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी राष्ट्रध्वजाच्या रंगांचा वापर करून दुकानाबाहेर सजावट केली आहे. सामाजिक माध्यमांवर देशप्रेमाचे स्टेटस आतापासूनच झळकू लागले आहेत.

अनेक कार्पोरेट कंपन्यांनी यंदा शनिवारी कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी तिरंगा रंगांची अथवा पारंपरिक पोषाखाची थीम ठेवली होती. अनेक सामाजिक संस्था आणि मंडळांमध्ये, शाळा महाविद्यालयांमध्ये प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, त्याची सिद्धताही जोमाने सुरु आहे. ऑनलाईन शॉपिंग संकेतस्थळांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त उत्पादनांवर विशेष सवलत ठेवली आहे. हिंदी मराठी चॅनल्सवरील डेली सोप आणि रिऍलिटी शोजमध्ये सुद्धा सध्या प्रजासत्ताक दिनाचाच फिवर आहे. मिठाईच्या आणि केक्सच्या दुकानांत तिरंग्याच्या रंगाच्या विविध मिठाया आणि केक्स विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. सारे वातावरण देशभक्तीने जणू न्हाऊन निघाले आहे. प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिन जवळ आला कि देशभरात देशप्रेमाचे वारे जोराने वाहू लागतात.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने कागदी आणि कापडी राष्ट्रध्वज सर्वत्र विक्रीसाठी आले आहेत. ५-१० रुपयांत मिळणारा राष्ट्रध्वज खरेदी करणे सोपे आहे; मात्र त्याचा योग्य तो सन्मान राखण्याची भावना आपल्यात निर्माण झाली आहे का हे अभ्यासनेही आज गरजेचे बनले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या एका पिढीने अपरिमित हालअपेष्टा सहन केल्या; मात्र त्यानंतरच्या पिढीने पुढच्या पिढीवर जे देशप्रेमाचे संस्कार करायला हवे होते ते न केल्याने स्वातंत्र्याचे मोल आजच्या पिढीला तितकेसे उरलेले नाही. राष्ट्रीय सणांच्या निमित्ताने रस्त्यावर पडलेले ध्वज आणि ध्वजांचे अवशेष गोळा करून त्यांची ध्वजसंहितेनुसार योग्य ती विल्हेवाट लावण्याचे काम काही स्वयंसेवी संघटना दरवर्षी करत असतात. मात्र त्यांच्यावर ही वेळ येऊच न देण्याची जबाबदारी आपली नव्हे काय ? स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी आपले राष्ट्रप्रेम दाखवण्यासाठी राष्ट्रध्वजाचे बॅज आपण छातीवर लावून मिरवतो. गाड्यांवर, घरांवर, दुकानांवर ध्वज फडकावतो, कागदी ध्वज विकत घेऊन ते पाल्यांना देतो; मात्र ते फाटतात, हरवतात तेव्हा ' जाऊ दे, १० रुपयांचा तर झेंडा होता' असे विचार आपल्या मनात येतात आणि आपण ते शोधायचा प्रयत्नही करत नाही. या दिवशी रस्त्यावरून जाताना एखादा ध्वज रस्त्यावर पडलेला दिसला तर तो उचलून खिशात ठेवण्याचा विचार तर येतो मात्र आजूबाजूचे लोक काय म्हणतील या विचाराने आपण तसे करण्याचे टाळतो. खरेदी केलेले ध्वज पुढील राष्ट्रीय सणासाठी जपून ठेवतो का किंवा ते फाटले असतील तर ध्वजसंहितेनुसार त्या ध्वजांची विल्हेवाट लावतो का ? आपल्या मनात आपल्या राष्ट्रध्वजाविषयी आस्था किती आहे हे जाणून घेण्यासाठी सदर उदाहरणे पुरेशी आहेत. राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्यासंदर्भात शासनाच्या वतीने प्रतिवर्षी ध्वजसंहिता प्रकाशित करण्यात येते मात्र ती वाचण्याची तसदी आपण कधी घेत नाही.

राष्ट्रध्वज हे देशाच्या सन्मानाचे प्रतीक असते त्यामुळे त्याचा योग्य तो मान राखणे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे. राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी शेकडो क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, घरादाराची राखरांगोळी केली, आयुष्यभर कारावास भोगला. त्यांच्याच बलिदानामुळे आज आपण स्वातंत्र्यात सुखाने जगत आहोत. लोकशाही व्यवस्थेच्या सुख सुविधा उपभोगत आहोत. राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी आजही आपले सैनिक सीमेवर ऊन, वारा, पाऊस कशाचीच तमा न बाळगता खंबीरपणे उभे असतात त्या राष्ट्रध्वजाचे उचित मूल्य आपल्या अंतर्मनात बिंबायला हवे. राष्ट्रीय सणांच्या दुसऱ्या दिवशी जेव्हा एकही राष्ट्रध्वज रस्त्यावर इतस्ततः पडलेला दिसणार नाही तेव्हाच आपल्यातील राष्ट्रध्वजाविषयीची अस्मिता जागृत झाली असे म्हणता येईल.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# प्रजासत्ताक दिन म्हणजेच स्वतंत्र भारताची नियमावली

२६ जानेवारी संविधानाचा व नियमांचा आधारस्तंभ आहे.१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु स्वातंत्र्यानंतर संविधान, देशाची नियमावली असने गरजेचे असते.कारण कोणत्याही कार्याकरीता पुढे पाऊल टाकण्यास कायद्याच बंधन असने आवश्यक आहे.२६ जानेवारी १९५० रोजी देशाची राज्यघटना लागु झाली.त्यानिमित्ताने भारतातील प्रत्येक नागरिक मोठ्या उत्साहाने प्रजासत्ताक दिन साजरा करीत असतो.

कारण प्रजासत्ताक म्हणजे लोकांव्दारे लोकांसाठी प्रस्थापित केलेले शासन. भारतात जात,धर्म, पंथ,वंश, गरीब-श्रीमंत, व्देष या संपूर्ण गोष्टी बाजूला ठेवून गुण्या-गोविंदाने प्रजासत्ताक दिवस वेगवेगळ्या संस्कृतीच्या माध्यमातून मोठ्या उत्साहाने साजरा करतात. २६ जानेवारी १९५० रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची लॉर्ड माऊंट बॅटन(गव्हर्नर जनरल) यांच्या जागी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड झाली.२६ जानेवारीच्या निमित्ताने दरवर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीतील राजपथावर राष्ट्रध्वज फडकवला जातो.आपण ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत आहोत.मुख्यत्वे करून २६ जानेवारीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना लागु करण्यात आली. त्यामुळे स्वतंत्र भारतासाठी हा मोठा आणि गौरवाचा दिवस मानल्या जातो.भारताला स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झाली असली तरी आजही देशात आपल्याला गुन्हेगारी, भ्रष्टाचार, बँक घोटाळे, झुंड बळी, जातीयवाद, हिंसाचार,यांच्याशी आजही आपण लढतोय ही स्वतंत्र भारतासाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.

अशा गुन्ह्या विरूद्ध सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे. कारण देश स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधी,भगतसिंग, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, झाशीची राणी, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, चंद्रशेखर आझाद, हजारो क्रांतिकारक, मवाळवादी -जहालवादी, थोर महात्मे इत्यादीसह लाखो स्वतंत्र शुरविरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उदयास आला. भारताच्या थोर महात्म्यांना भारत स्वतंत्र करण्यासाठी दोन नद्यांचा सहारा घ्यावा लागला व त्या दोन नद्यांचा उगम म्हणजे एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच भारतीय स्वातंत्र्यलढा उभा झाला. याकरिता आपल्याला १५ ऑगस्ट१९४७ उजाडण्यासाठी तब्बल १५० वर्षे वाट पाहावी लागली.

१५० वर्षांच्या काळातील स्वतंत्र विरांचे बलीदान व्यर्थ जावु नये व त्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना अस्तित्वात आणली. यात मुख्यत्वेकरून डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल,पंडित जवाहरलाल नेहरूसह अनेक थोर महात्म्यांचा सिंहाचा वाटा आहे.परंतु दु:खाची गोष्ट म्हणजे गेल्या ३० वर्षांपासून देशात भ्रष्टाचार, करोडोचे घोटाळे, बलात्कार, गुन्हेगारी,निवडणुकांमध्ये जातीयवाद याला मोठ्या प्रमाणात उत आल्याचे पहायला मिळते.ही शहिद विरांच्याप्रती अत्यंत दु:खद व चिंताजनक बाब आहे.

आपल्या पुर्वजांनी व देशाच्या स्वतंत्र संग्राम सेनानींनी आणि बहादुर विरांनी घर-दार, परीवार या संपूर्ण गोष्टी बाजूला सारून व त्याग करून स्वातंत्र्याच्या अग्नी कुंडात उडी घेतली व लाखोंच्या संख्येने बलीदान दिले. परंतु आपली शोकांतिकाच म्हणावी लागेल की आपण भारत स्वतंत्र होऊन ७८ व्या वर्षीत पदार्पण करीत आहोत तरीही भारतातील भ्रष्टाचार थांबलेला नाही.आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांजवळ, पुंजीपतीं, वॉलीउडक्षेत्र व भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांजवळ वाममार्गाने कमवीलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आजही आहे. ही संपत्ती एकत्र केली तर भारताला तब्बल १० वर्षे कोणाही जवळुन कर्ज घ्यावे लागणार नाही व गरीबी आणि महागाई संपुष्टात येवु शकते आणि देश सुजलाम - सुफलाम होण्यास मोठी मदत मिळेल.याकरिता भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट राजकीय पुढारी ही देशाला लागलेली कीड आहे ही कीड जळामुळासकट नष्ट व्हायला हवी व यावर आळा बसायला हवा.

आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवल्याने व चलनात नसल्याने देशातील गरीब वर्ग गरीबीच्या खाईत जात आहे तर श्रीमंत वर्ग दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व देशाच्या विकासामध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे. यामुळेच देशात महागाई व बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते.भारताचे प्रजासत्ताक दिनाचे ७६ व्या वर्षाचे औचित्य साधून देशातील संपूर्ण भ्रष्टाचाऱ्यावर कठोर कारवाई करून त्यांनी वाममार्गाने कमवीलेला पैसा सरकारने आपल्या तिजोरीत जमा करावा.

यामुळे देशाचा विकास, बेरोजगारीची समस्या, महागाई यावर आळा घालण्यासाठी मोठी मदत होईल व देशाचा विकास भरभराटीला येईल.याचे स्वागत आपले पुर्वज,शहीद व स्वतंत्र सेनानी अवश्य करेल व त्यांच्या स्वतंत्र लढ्याला दिलासा अवश्य मिळेल हीच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शहिदांना खरी आदरांजली ठरेल. देशात वाढते हवामानातील बदल, प्रदूषण व ग्लोबल वामिंगचा धोका पहाता.प्रजासत्तक दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी. याकरीता शाळा, कॉलेज, संपूर्ण सरकारी क्षेत्र, राजकीय पुढारी, सामाजिक संघटना यांनी पुढाकार घ्यायला हवा.यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होईल व प्रदूषणावर मात करण्यासाठी मोठी मदत मिळेल. आजच्या दिवशी वृक्षलागवड झाली तर ती अनंतकाळापर्यंत सर्वांच्या हृदयात राहील व लाखो शुरविरांचे दर्शन प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला होईल. यामुळे भारतीय शहिदांची व शुरविरांची गाथा अबाध्य आहे.कारण त्यांच्या आशीर्वादानेच आपण आज मोकळा श्वास घेत आहोत. जय हिंद!

**लेखक**
**रमेश लांजेवार, नागपूर**
**मो.९९२१६९०७७९**

# राष्ट्रध्वजातील रंगांचा सन्मान राखला जावा !

**वाचक पत्र**

जसजसे राष्ट्रीय सण जवळ येतात तसे भारतीयांचे देशप्रेम कमालीचे उफाळू लागते. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने एक आठवडा आधीपासूनच काही उत्पादकांनी आपल्या उत्पादनांच्या पॅकेट्सवर तिरंगे छापायला सुरुवात केली आहे/ सामाजिक माध्यमांवर आपल्या देशप्रेमाची पावती देण्यासाठी झेंडे घेऊन सेल्फी काढण्यासोबत तिरंग्याच्या रंगाचे कपडे परीधान केलेले फोटो काढून ते अपलोड करणे, चेहऱ्यावर तिरंग्यासारखे टॅटू काढणे यांसारखे प्रकार सोशल मीडियावर मागील दोन दिवसांपासूनच पाहायला मिळू लागले आहेत. स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन या राष्ट्रीय सणांच्या दिवशी तिरंग्याच्या तीन रंगाची इतकी क्रेझ असते कि, मिठाईच्या दुकानात तिरंगी पेढे आणि केकच्या दुकानांमध्ये तिरंगी केक्सना विशेष मागणी असते. बहुतांश दुकानाबाहेर राष्ट्रध्वजातील रंगांची फुग्यांची सजावट केली जाते. राष्ट्रध्वजाच्या रंगाचा अशाप्रकारे होत असलेला सुमार वापर पाहिल्यावर राष्ट्रध्वज ही शोभेची वस्तू तर बनली नाही ना ? असा प्रश्न पडतो. राष्ट्रध्वज हा राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक आहे, त्याचा योग्य तो मान राखणे, हे प्रत्येक भारतीयाचे अलिखित कर्तव्य आहे. त्याग, क्रांती, शांती व समृद्धी या मूल्यांची शिकवण राष्ट्रध्वज आपल्याला देतो. उत्साहापोटी राष्ट्रध्वजाच्या रंगांचा गैरवापर करतांना आपण ही मूल्येच पायदळी तुडवत नाही ना याचे भान राखले गेले पाहिजे.

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी**

# प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी मुंबई मनपा मुख्यालयास आकर्षक रोषणाई



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२५, नवी मुंबई :** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ध्वजवंदन समारंभ उद्या सोमवार, दि.२६ जानेवारी २०२६ रोजी, सकाळी ८.०० वा. महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न होत आहे. याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात येत आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त आयकॉनिक वास्तू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयास आकर्षक रोषणाई करण्यात आलेली असून इमारत तिरंगी रंगात झळाळत आहे.

# भारत बलशाली होईल !



स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत. हे दोन्ही राष्ट्रीय सण संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात साजरा केले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण या दिवशी तिरंग्याला मानवंदना देऊन देशाप्रती कृतज्ञता व्यक्त करीत असतात ; पण दुर्दैवाने अनेक लोकांना स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन यातील फरक सांगता येत नाही.

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. इंग्रजांच्या दिडशे वर्षाच्या गुलामीतून भारत स्वातंत्र्य झाला. देश स्वातंत्र्य झाला तेव्हा आपल्या देशाला स्वतःचे संविधान नव्हते. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपल्या देशाचे कायदे हे भारतीय राज्यशासनाच्या १९३५ सालच्या कायद्यावर ( कलमावर ) आधारित होते. स्वतंत्र देशाला स्वतःचे संविधान असावे. त्या संविधानात देशाचा कारभार कसा चालवायचा या संबंधी नियम व कायदे असावेत तसेच नागरिकांचे हक्क व कर्तव्याचा देखील त्यात समावेश असावा असे सर्वांचे मत होते.

हे संविधान तयार करण्याचे शिवधनुष्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या विद्वानाने पेलावे असे आव्हान करण्यात आले. तेव्हा देशाचे संविधान तयार करण्याचे आव्हान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसुदा समिती नेमण्यात आली. या संमतीने संविधानाचा मसुदा तयार करून तो ४ नोव्हेंबर १९४७ रोजी सभेपुढे सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवस खुला केला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या नेतृत्वाखालील समितीने दोन वर्ष, अकरा महिने आणि अठरा दिवसात संविधानाचा मसुदा तयार केला. बरेचसे विचार विमर्श आणि सुधारणा केल्यावर २४ जानेवारी १९५० रोजी विधानसभेच्या ३०८ सदस्यांनी हा मसुदा मान्य केला. संविधानाच्या दोन हस्तलिखित प्रति तयार करण्यात आल्या. इंग्रजी व हिंदी भाषेत या प्रति होत्या. दोन दिवसांनी म्हणजे २६ जानेवारी १९५० पासून या संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली आणि भारत प्रजासत्ताक राष्ट्र बनले.

संविधानाने आपल्याला मूलभूत हक्कांसोबत मूलभूत कर्तव्ये देखील दिली आहेत. हक्क आणि कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपण जितके हक्कांबाबत जागरूक असतो तितके आपण आपल्या कर्तव्याबाबत जागरूक नसतो. जर देशातील प्रत्येक नागरिकाने आपल्या संवैधानिक हक्कांसोबत संवैधानिक कर्तव्ये देखील प्रामाणिकपणे बजावली तरच भारत बलशाली होईल !

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाऊस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail. com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२

# प्रसिद्ध तारपा वादक भिकल्या धिंडा यांना पद्म पुरस्कार घोषित

## पालघर जिल्ह्यातील जव्हारचे रहिवासी, तारप्याला देव मानणारा कलावंत

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२५, पालघर :** जिल्ह्यातील प्रसिद्ध तारपा वादक आणि अनेक पुरस्काराने सन्मानित असलेल्या भिकल्या लाडक्या धिंडा यांना पद्म पुरस्कार घोषित झाल्याने पालघर जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे अनेक पुरस्काराने सन्मानित असलेल्या भिकल्या धिंडा यांना अतिशय प्रतिष्ठेचा असा पद्म पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांनी आजवर जपलेल्या या कलेचा एक प्रकारेच हा सन्मान असल्याचे बोलले जात आहे. घरातच तारपा वादन वर्षानुवर्षे चालत असल्यामुळे त्यांना लहानपणापासूनच तारपा बाजूने आवड होती लहानपणी वयाच्या दहाव्या वर्षापासून ते जंगलात गुरेढोरे चरावयास घेऊन जात असत. त्यावेळी ते आपल्या सोबत तारपा वाद्य घेऊन जात असत भिकल्या दिंडा यांच्या घराण्यात साधारण दीडशे वर्षापासून तारपा वादाची परंपरा आहे त्यांचे आजोबा नवसु धाकल्या धिंडा तारपा वादन करत असत त्यानंतर त्यांचे वडील लाडक्या धाकल्या धिंडा हे सुद्धा तारपा वाजवित असत.

यासाठी त्यांना आजवर अनेक पुरस्कार मिळालेले आहेत यामध्ये तारपा शिरोमणी पदवी सांस्कृतिक सेनानी सन्मान राष्ट्रीय




संगीत नृत्य आणि नाटक अकादमी नवी दिल्ली कडून संगीत नाटक अकादमी पुरस्कार २०२२ देखील त्यांना प्राप्त झालेला आहे याशिवाय २०२३ मध्ये त्यांना पालघर भूषण आणि पालघर जिल्हा परिषदेचे ब्रँड दूत म्हणून सुद्धा त्यांची निवड करण्यात आली होती याशिवाय देशभर होणाऱ्या विविध कला संस्कृती संदर्भातील अनेक कार्यक्रमात धिंडा यांचा सन्मान करण्यात येतो. याशिवाय त्यांच्या तारपा वादनाचे भव्य दिव्य कार्यक्रम सुद्धा होत असतात. भिकल्या धिंडा यांनी एका वाद्यासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातली आहे खरं तर धाकल्या हे श्वास घेणारा तारपा आमचा देव आहे असेच म्हणतात. जव्हार तालुक्यातील वाळवंडा या गावातील राहतात. सुरुवातीला त्यांच्याकडे रोजगाराचे साधन उपलब्ध नव्हते आपल्या कलेच्या जीवावर उदरनिर्वाह करण्यासाठी ते तारपा घेऊन विविध तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी गेले सुरुवातीला त्यांच्या या कलेकडे दुर्लक्ष झाले मात्र आज ते या तारपा वादक म्हणून जगप्रसिद्ध आहेत. खरंतर आज भव्य दिव्य स्टुडिओमध्ये काम करणाऱ्या अनेक कलावंतांना किंमत आहे.

मात्र घशाला कोरड पडून शिरात आणून छातीचा भाता करून जीवाच्या आकांताने तारपा वाजवणाऱ्या अशा अनेक कलाकाराकडे सरकारचे नेहमी दुर्लक्ष होत असते मात्र आज धिंडा यांना जाहीर झालेल्या या पद्म पुरस्कारामुळे अशा अनेक तारपा वादकांमध्ये एक आशेचा किरण नक्कीच निर्माण झाला आहे. आदिवासी भागात असे अनेक तारपा वादक आपल्या संस्कृतीचे जतन संवर्धन करत आहेत अशा अनेक कलाकारांचा सन्मान आणि रोजी रोटी साठी मानधन देखील शासनाने चालू करणे आवश्यक आहे.

# मुंबई लोकलबाबत आयआयटी सादर करणार अहवाल

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२५, मुंबई :** मुंबई लोकल म्हणजे समस्त मुंबईकरांची जीवनवाहिनी. मुंबईत मध्य, पश्चिम आणि हार्बर मार्गावरुन दररोज सुमारे ६८ ते ७० लाख प्रवासी प्रवास करतात.सार्वजनिक वाहतुकीसाठी महामुंबई एकात्मिक तिकीट प्रणाली राबविण्यात येतेय. मुंबईच्या उपनगरीय लोकलला दरवर्षी ३ हजार कोटीचा तोटा कमी करण्यासह वाहतूक क्षमता वाढविणे, देखभालीसाठी कोणत्या उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. लोकलची क्षमता वाढविणे, एसी लोकलच्या तिकीट दराची पूर्नरचना, तोटा कमी करण्यासाठी उपाय, लोकलचे वेळापत्रक यासह अनेक बाबींवरील अभ्यास अहवाल इंडियन इन्स्टट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी) शुक्रवार, दिनांक ३० जानेवारी २०२६ प्रकाशित करणार आहे.मुंबईकरांची प्रवासासाठी पहिली पसंती ही लोकल प्रवासालाच असते.

सकाळी-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी लोकलला प्रचंड गर्दी असते. गर्दीमुळे लोकलमधून पडून आणि रुळ ओलांडताना होणाऱ्या मृत्युची संख्या जास्त आहे. त्यातच लोकलच्या तिकिटात गेल्या अनेक वर्षांपासून बदल झालेला नाही. तिकिट जास्त असल्याने सामान्य प्रवासी आजही एसी लोकलने प्रवास करत नाहीत.दरम्यान मध्य आणि पश्चिम लोकलचा अभ्यास टप्प्याटप्प्याने होणार करण्याचे मुंबई रेल्वे विरास महामंडळाने (एमआरव्हीसी) आयआयटी मुंबईला दिले. महामुंबईतील रेल्वे मार्गाचा विस्तार करणे, नवे रेल्वे मार्ग उभारणे, रेल्वे प्रकल्पांना अर्थपुरवठा करणे अशी मुख्य जबाबदारी एमआरव्हीसीची आहे, मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या ताफ्यात टप्याटप्याने सर्व लोकल एसी होत आहेत. एसी लोकलची खरेदी, गाड्या, चालवण्याचा खर्च, प्रवासी उत्पन्न यांच्या विश्लेषणाच्या माध्यमाने व्यवहार्य आर्थिक मॉडेल तयार करण्यात येत आहे.

रेल्वे, मेट्रो, बेस्ट अशा सर्व सार्वजनिक वाहतूकीसाठी महामुंबईत एकात्मिक तिकीट प्रणाली राबवण्यात येत आहे. त्याच्या व्यवहार्यता तपासणीचे काम अहवालात केले आहे. यासाठी ५ कोटी रुपयांचा खर्च आला आहे.

भविष्यात सुरू होणाऱ्या मेट्रो आणि लोकलच्या विस्तारानंतर प्रवाशांना दर्जेदार सुविधा मिळवण्यासाठी योजनांच्या अंमलबजावणीचे टप्पे, आवश्यकतेनुसार वेळापत्रकात बदल, पायाभूत सुविधांची उभारणीच्या कालबद्ध शिफारसी आयआयटी एमआरव्हीसीला करणार आहे. मुंबई प्रवाशांची मागणी, भाडे, खर्च आणि पायाभूत सुविधांवरील आव्हानांचा अभ्यास, भविष्यातील धोरण आणि गुंतवणूक निर्णयांना मार्गदर्शन, १६ पेपर्सच्या या संशोधनात अनेक व्यापक आयामांचा अभ्यास, ट्रेनचा वापर, वक्तशीरपणा, मालमत्तेचा वापर, देखभाल पद्धती, कर्मचारी भरती पद्धती आणि ऊर्जेचा वापर यांचे मूल्यांकन, टर्मिनल क्षमतेच्या मर्यादा, सिग्नलिंग मर्यादा आणि टर्नअराउंड वेळा यासह विद्यमान नेटवर्कमधील अडथळ्यांचा विचार केला गेला आहे.

# भारतीय जनता पार्टी चंद्रपूर शहर महानगर कार्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी

## नेताजींच्या राष्ट्रभक्तीचा आदर्श आत्मसात करा : आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** भारतीय जनता पार्टी चंद्रपूर शहर महानगरच्या कार्यालयात आज महान स्वातंत्र्यसैनिक नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी नेताजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. नेताजींच्या राष्ट्रभक्तीचा आदर्श आत्मसात करण्याचे आवाहन यावेळी बोलतांना आ. किशोर जोरगेवार यांनी केले.

या प्रसंगी भारतीय जनता पक्षाचे महामंत्री नामदेव डाहुले, विधानसभा अध्यक्ष दशरथसिंह ठाकुर, महिला आघाडी महामंत्री सायली येरणे, बहुजन महिला आघाडी अध्यक्ष विमल कातकर, प्रा. श्याम हेडाऊ, रामकुमार आकापल्लीवार, कल्पना शिंदे, अल्का मेश्राम, वंदना हजारे, रश्मी पांडे, संजय महाकालीवार, रेणुका येरणे, भाग्यश्री येरणे, छाया चवरे, शालीनी राऊत, लिना साखरकर, बादल हजारे आदिंची उपस्थिती होती.

कार्यक्रमात बोलताना आ. किशोर जोरगेवार म्हणाले की, नेताजी सुभाषचंद्र बोस हे केवळ स्वातंत्र्यसैनिक नव्हते, तर ते देशाच्या स्वाभिमानाचे प्रतीक होते. तुम मुझे खून दो, मैं तुम्हें



आजादी दूँगा हा त्यांचा नारा आजही प्रत्येक भारतीयाच्या अंगात स्फुरण चढवतो, नेताजींनी स्थापन केलेली आजाद हिंद सेना ही भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील क्रांतिकारक पर्वाची साक्ष आहे. त्यांच्या धैर्याने, शिस्तीने आणि राष्ट्रभक्तीने प्रेरणा घेऊन आजच्या पिढीने देशसेवा, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रउभारणीसाठी पुढे यावे, असे आवाहन आ.जोरगेवार यांनी केले. ते पुढे म्हणाले की, देशासाठी त्याग, नि:स्वार्थ सेवा आणि राष्ट्र प्रथम हीच नेताजींची खरी शिकवण आहे. आजच्या काळात त्यांच्या विचारांची अधिक गरज असून, प्रत्येक कार्यकर्त्याने नेताजींच्या आदर्शांवर चालण्याचा संकल्प करावा. असे ते म्हणाले.

# टाकळी ढोकेश्वर कावड यात्रेचे प्रस्थान

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल बिरोबा मित्र मंडळाच्या वतीने सालाबादप्रमाणे दरवर्षी कावड यात्रेचे आयोजन करण्यात येते. रविवार, दि.२५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी यावर्षी नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर ते टाकळी ढोकेश्वर कावड यात्रा टाकळी ढोकेश्वर येथे मोठ्या उत्साहात काढण्यात आली. यामध्ये बिरोबा कावड मित्रमंडळाच्या ३० सदस्यांनी सहभाग घेतला.

माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य शिवाजी खिलारी व उपसरपंच किरण तराळ तसेच बिरोबा कावड मंडळाचे मार्गदर्शक बिरोबा पतसंस्थेचे चेअरमन संपतराव तराळ यांनी कावड यात्रेचे नारळ वाढवून विधीवत पूजन केले. यावेळी बाजार समितीचे माजी सभापती विलास झावरे, बबन झावरे, बाजीराव गोरडे भगवान गायकवाड,बिरोबा कावड मंडळाचे अध्यक्ष प्रसाद झावरे, उपाध्यक्ष सोनू खिलारी, सचिव अनिल भाकरे, बिरोबा भगत विष्णू धुमाळ, भाऊसाहेब रांधवण, जयसिंग जाधव, सागर नाईकवाडी, बबन गोरडे,भाऊ तराळ, संतोष तराळ,भरत गायकवाड, पाटील दाजी, अशोक पानमंद सुदामा झावरे,कुशाभाऊ झावरे, पप्पू झावरे, भाऊसाहेब झावरे, नामदेव आल्हाट,धोंडिभाऊ निवडुंगे, प्रविण झावरे उपस्थित होते. फेब्रुवारी महिन्यातील माघ



पौर्णिमेचे औचित्य साधून वाजत गाजत पायी कावड यात्रा काढण्यात आली. हि कावड यात्रा नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथील तीर्थ क्षेत्र त्र्यंबकराज चे दर्शन घेऊन जगप्रसिद्ध कुशावर्त तीर्थ क्षेत्र घाटावर पाण्याचा अभिषेक पूर्वापार पद्धतीने केल्यानंतर कावड कुशावर्त तीर्थच्या पाण्याने भरल्या जातात.

गोदावरी नदीच्या पाण्याला गंगा नदी इतकेच महत्व आहे. आज सोमवारी पहाटे अभिषेक, पुजा आरती झाल्यानंतर कावड घेऊन भाविक रवाना झाले. त्र्यंबकेश्वर, नाशिक, सिन्नर, संगमनेर,साकुर,खडकवडी याठिकाणी मुक्काम करून तर ठिक ठिकाणी विसावा घेऊन ते पुढील यात्रेसाठी रवाना झाले.

# भाजप जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघ यांची 'पीएम विश्वकर्मा' शासकीय समितीवर निवड

## केंद्र सरकारच्या पीएम विश्वकर्मा समितीवर शंकरराव वाघ यांची वर्णी; सर्वस्तरातून अभिनंदन

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२५, विंचूर (नाशिक) :** केंद्र सरकारच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा 'पीएम विश्वकर्मा' योजनेच्या शासकीय समितीवर भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघ यांची निवड करण्यात आली आहे.

नवी दिल्ली येथील सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्यम (MSME) मंत्रालयाच्या पीएम विश्वकर्मा विभाग विकास कार्यालयातून ही निवड जाहीर करण्यात आली आहे. एका सामान्य कार्यकर्त्याला थेट केंद्रीय समितीवर संधी मिळाल्याने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात वाघ यांचे कौतुक होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या पीएम विश्वकर्मा योजनेच्या अंमलबजावणी आणि देखरेखीसाठी



गठीत करण्यात आलेल्या या समितीवर वाघ यांची नियुक्ती झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल भाजपचे राष्ट्रीय ओबीसी मोर्चा अध्यक्ष खा.के.लक्ष्मण, राष्ट्रीय सरचिटणीस विनोदजी तावडे, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री तथा कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन आणि केंद्रीय मंत्री डॉ. भारतीताई पवार यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

शंकरराव वाघ यांच्या निवडीचे वृत्त समजताच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. यामध्ये प्रामुख्याने भाजप प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, प्रदेश संघटन मंत्री रवीजी अनासपुरे, किशोर काळकर, आ. देवयानी फरांदे, आ. सीमाताई हिरे, आ. डॉ. राहुल आहेर, आ. राहुल ढिकले, आ. दिलीप बोरसे, आ. सुहास कांदे, आ. नितीनजी पवार, माजी आ. बाळासाहेब सानप, लक्ष्मण सावजी, विजय साने, सुनील केदार, यतीन कदम यांचा समावेश आहे.

तसेच सुनील बच्छाव, निलेश कचवे, दादा जाधव, प्रशांत जाधव, सुरेश आण्णा पाटील, सुनील खोडे, पप्पू माने, केशवराव सुरवाडे, आनंद शिंदे, सतीश मोरे, भागवत बाबा बोरस्ते, संदीप नागरे, संतोष सोनवणे, योगेश चौधरी, परेश शहा, अक्षय जोशी, ॲड. वाल्मीक राव गायकवाड, राजू राणा, छोटू काका पानगव्हाणे, नवनाथ जाधव, अशोक निफाडे, राजेंद्र चाफेकर, रमेश अण्णा घुगे, गणेश धात्रक, डॉ.अभय निकम, एस. के. पगार सर, भूषण कासलीवाल, कैलास शिंदे, विजय साळवे, शंकर मोरे, विनायक खालकर, जगन आप्पा कुटे, पंढरीनाथ पीठे, रवींद्र बागडे, गोरख कर्वे, भरत बोरगुडे, किसन आहेर, बाळासाहेब कर्डिले, दिनकर खालकर, योगेश कांदळकर, योगेश कुंदे, वसंत कापसे, पुंजाराम कडलक, तय्यब शेख, संदीप शिरसाट, दिलीप मंडलिक, मयूर गावडे, आकाश मोरे, गौरव व्यवहारे आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वाघ यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# गंजाड केंद्रांतर्गत ५९ वा बालक-पालक मेळावा उत्साहात संपन्न

## आदिवासी भागातील शैक्षणिक परंपरेचा गौरवशाली वारसा जपण्याचा निर्धार

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२५, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील ग्रामपंचायत गंजाड येथे गंजाड केंद्रांतर्गत आयोजित करण्यात आलेला ५९ वा बालक-पालक मेळावा मोठ्या उत्साहात आणि लोकसहभागात पार पडला.

आदिवासी भागात शिक्षणाचा पाया घालणाऱ्या जव्हारचे यशवंतराव मुकणे राजे यांनी सुरू केलेल्या शाळेमुळे या परिसरात शैक्षणिक चळवळीला दिशा मिळाली. सन १९६९ मध्ये कै. वालजी भिकाजी देसक गुरुजी यांच्या वाढदिवसानिमित्त ठाणे जिल्ह्यातील पहिल्या बालक-पालक मेळाव्याची परंपरा सुरू झाली, जी आजतागायत सातत्याने जपली जात आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देणे, त्यांचा शैक्षणिक तसेच वैयक्तिक विकास घडवून आणणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश असून, ठाणे जिल्ह्यातील एकमेव बालक-पालक मेळावा म्हणून या उपक्रमाची विशेष ओळख आहे. या मेळाव्यास डहाणू विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार विनोद निकोले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालक-पालक मेळावा समितीचे अध्यक्ष व ग्रामपंचायत सरपंच अभिजीत देसक होते.



यावेळी उपसरपंच कौशल कामडी, ग्रामपंचायत सदस्य मनिषा कोदे, कैलास दळवी, अनिता कोठारी, वनिता हाडळ, कल्पेश ठाकरे, महेश हाडळ, रुपेश घोरखना, तंटामुक्त समिती अध्यक्ष प्रवीण वरठा, माजी सरपंच चंद्रकांत कोम, जानी वरठा, सदाशिव म्हसे, केंद्रप्रमुख महादू रावते, महेश शेकडे, मुख्याध्यापक दिनेश धोंडिया, माजी विस्तार अधिकारी कृष्णा गुरोडा, शिक्षक संदीप वाडेकर, दामोदर घोरखना, पुंडलिक सुपेकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी, पालक, पत्रकार व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

मेळाव्याच्या माध्यमातून बालक-पालक संवाद वाढवणे, शाळा व्यवस्थापनातील अडचणी, शिक्षणातील आव्हाने तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली. शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी पालक व शिक्षकांकडून विविध सूचना मांडण्यात आल्या. पालक-शिक्षक संबंध अधिक दृढ व्हावेत यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.

या कार्यक्रमात गंजाड केंद्रांतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद शाळा व शासकीय आश्रम शाळांचा सक्रिय सहभाग लाभला. तसेच गंजाड रायतळी प्रीमियर लीग, आर. के. सी. यांच्यासह इतर संस्था व कंपन्यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. प्रमुख पाहुणे आमदार विनोद निकोले यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, शिस्त आणि जीवनमूल्यांबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात अभिजीत देसक यांनी बालक-पालक मेळाव्याचा गौरवशाली इतिहास उलगडून सांगत, ही शैक्षणिक परंपरा जपणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश शेकडे यांनी केले, तर सूत्रसंचालन शंकर आमटे यांनी केले. एकूणच हा बालक-पालक मेळावा अत्यंत यशस्वी ठरला असून, पालक-शिक्षक-विद्यार्थी आणि प्रशासन यांच्यातील सहकार्य अधिक दृढ झाल्याचे चित्र यानिमित्ताने दिसून आले.

# मिलिंद प्राथमिक शाळेच्या बाल वैज्ञानिकांची राज्यस्तरीय झेप!

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२५, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथील सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मिलिंद प्राथमिक शाळा कुंडलवाडी च्या वर्ग सातवी ब सेमी च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला मल्टीपर्पज स्टेशनरी बाईक या नावीन्यपूर्ण व अतिशय सोप्या पद्धतीने तयार केलेल्या विज्ञान प्रयोगाची जिल्हास्तरावर प्राथमिक गटातून प्रथम क्रमांकाने निवड करण्यात आली असून येत्या २८ जानेवारी ते १फेब्रुवारी दरम्यान नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी या प्रयोगाची






निवड करण्यात आली आहे. मिलिंद प्रा.शाळेचे विज्ञान शिक्षक संभाजी गायकवाड व गजानन गड्डपवार यांच्या मार्गदर्शनाखाली वर्ग सातवीब सेमी चे विद्यार्थी कु.रुद्राक्षी राहुल अर्जुने, कु.प्राची सुनील नरावाड व प्रदीप गंगाधर पाटील दौलापूरकर या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रयोगाने सर्वच परीक्षकांचे कौतुक मिळविले. नांदेड येथील ग्रामीण पॉलीटेक्निक कॉलेजच्या परिसरामध्ये ही स्पर्धा दिनांक २१,२२ व २३ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली होती. मिलिंद प्रा.शाळेच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष कुणाल लोहगावकर म्हणाले की, हे यश केवळ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कौशल्याचे प्रमाण नाही तर संस्थेच्या नवकल्पना, संशोधन आणि सर्जनशीलतेच्या मूल्यांचेही प्रतीक आहे.

यावेळी संचालक विजयकुमार लोहगावकर, मिलिंद प्रा.शाळेचे मु.अ.आर.डी.नरावाड, मिलिंद विद्यालयाचे मु.अ.एच.एन.पांचाळ तसेच दोन्ही शाळेचे सर्वच शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या संपूर्ण टीमचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे व पुढील राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. एकंदरीतच परिसरातील सर्वच क्षेत्रातील व्यक्तींकडून व पालकांमधून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# विसापूर येथे अल्कोहालिक्स अनानिमसचा रौप्य महोत्सवी कार्यक्रम

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** कळत न कळत दारूच्या आहारी गेलो. प्रारंभी दारू प्राशन केल्यावर आनंद वाटायचा. आम्ही पहिल्यांदा दारू पित होतो. कालांतराने दारू आम्हाला प्यायला लागली. यातून कुटुंबात कलह निर्माण व्हायला लागला. नातेवाईक व समाज दारूड्या म्हणून हेटाळणी करू लागला. ईश्वरच आमचे कडून करवून घेत आहे. ही भावना वाटायला लागली. मात्र अल्कोहोलिक्स अनॉनिमस द्वारे संचालित वर्तमान समुहाच्या संपर्कात आलो. नियमित सभा केल्या. यातून सकारात्मक विचार प्रेरणादायी ठरले. मद्यपाश आजारातून मुक्त झालो. आजघडीला दारूपासून मुक्त झाल्याने सुखी व आनंदी जीवनाला सामोरे जात आहे, असे स्वकथन




दारूपासून मुक्त झालेल्यांनी केल्याने अंतर्मुख होण्यास भाग पाडले. बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथील पंढरीनाथ देवस्थान, मंगल कार्यालयात अल्कोहालिक्स अनानिमसच्या वर्तमान समुहाच्या वतीने शनिवार,दि.२३ व रविवार, दि.२४ जानेवारी २०२६ रोजी या कालावधीत रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून दोन दिवस दारू व्यसनमुक्ती झालेल्यांचे विचारमंथन झाले.

या कार्यक्रमाचे उदघाटन जिल्हा परिषद माजी सदस्य रामभाऊ टोंगे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपसरपंच अनेकश्वर मेश्राम, सामाजिक कार्यकर्ते मोहन देठे, सुनिल बुटले, मुर्लिधर, किशोर यांची उपस्थिती होती. मार्गदर्शक म्हणून रामभाऊ टोंगे म्हणाले, दारू व्यसनाच्या आहारी गेलेल्यांचे संसार उद्ध्वस्त झाले. हा प्रकार प्रत्यक्ष पाहिला. यामुळे मन उद्विग्न होते. मात्र आपण दारू व्यसनापासून मुक्त झालात. खरे तर आपण देव माणूस झालात. आपल्या समाजोपयोगी कार्याला माझे सहकार्य सदैव राहिल. या उपक्रमाला शुभेच्छा व्यक्त करतो, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान किशोर यांनी दारु व्यसनापासून मुक्त होण्यासाठी बारा रूढी, विजय यांनी बारा पायऱ्या सांगितल्या. किशोर यांनी अलकोहोलिक्स ॲनानिमसचा इतिहास कथन केला. भास्कर, मनिषा, केदार यांनी स्वतःच्या दारू व्यसनाचे कुटुंबावर होणारे दुष्परिणाम कथन केले. प्रास्ताविक दिनेश यांनी केले. संचालन प्रभाकर एस. यांनी केले. आभार प्रदर्शन दौलत सी.यांनी मानले.

या रौप्य महोत्सवी कार्यक्रमाला विसापूर, बल्लारपूर, चंद्रपूर, राजुरा, नांदगाव (पोडे) येथील अलहोलिक्स अनानिमस सोबत जुळलेल्या विविध समुहाच्या कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मुदखेड येथील शासकीय विश्रामगृहात वंचित बहुजन आघाडीची आढावा बैठक संपन्न

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२५, मुदखेड (नांदेड) :** नांदेड जिल्हा वंचित बहुजन आघाडी उत्तरची नुतन कार्यकारणी जाहीर होताच जिल्हाध्यक्ष प्रा.राज अटकोरे, जिल्हा महासचिव दिपक मगर व जिल्हा उपाध्यक्ष के.एच.वने, बालाजी सुर्यतळे, अहंकारे, संघटक वाढवे, आणि सल्लागार प्रा. प्रल्हाद इंगोले यांनी मुदखेड तालुका व शहरातील वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची आढावा बैठकीचे आयोजन दि.२३ जानेवारी २०२६ रोजी शासकीय विश्रामग्रह येथे करण्यात आले होते. या बैठकीत नुतन जिल्हाध्यक्ष प्रा. राज अटकोरे यांनी सांगीतले आहे कि वंचितच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी तालुक्यांतील प्रत्येक गावामध्ये जाऊन बुथ बांधणी करून वंचित बहुजन आघाडी पक्षाला मजबूत करून श्ध्येय बाळासाहेब आंबेडकर यांचे हात मजबुत करा. या आढावा बैठकीचे औचित्य साधुन वंचितचे दादाराव किशनराव चौदंते यांच्या वतीने नांदेड जिल्हा वंचित बहुजन आघाडी उत्तरचे नुतन कार्यकारणी यांचे सत्कार स्वागत करण्यात आले. यावेळी डि.जी. चौदंते, बाबुराव कोलते, राहुल चौदंते, अमोल चौदंते, शिलवंत डोंगरे, रोहन चौदंते, स्वयंदिप कांबळे, विकी गजभारे, रितीक चौदंते, सुभाष दुधंबे, अमोल चौदंते, संतोष चौदंते, यांच्यासह आदि कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# 'माझा भारत, माझं मत, मी भारत आहे' ठाण्यात १६ वा राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, ठाणे :** लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी आणि मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी आज ठाणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने '१६ वा राष्ट्रीय मतदार दिन' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. माझा भारत, माझे मत, मी भारत आहे या मुख्य संकल्पनेवर आधारित हा मुख्य शासकीय कार्यक्रम जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रूपाली भालके, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) सर्जे राव मस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (रोहयो) शशिकांत गायकवाड, उपजिल्हाधिकारी (मेट्रो सेंटर) वरुणकुमार सहारे, ठाणे प्रांताधिकारी उर्मिला पाटील, तहसिलदार सचिन चौधर, संदीप थोरात, राजेंद्र चव्हाण, प्रदीप कुडाळ, नायब तहसिलदार स्मितल यादव, निवडणूक दूत नीता केणे (किन्नर अस्मिता), अपंग विकास महासंघाचे अध्यक्ष अशोक भोईर, ठाणे सिटीजन फाउंडेशनचे अध्यक्ष कॅस्बर ऑगस्टीन यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालय व निवडणूक शाखेतील इतर अधिकारी-कर्मचारी आदि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्यासह उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त प्रतिज्ञा घेतली.

लोकशाहीत मतदारांचे स्थान सर्वोच्च..

-जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ म्हणाले की, भारतीय संविधानाने आपल्याला मतदानाचा अत्यंत महत्त्वाचा अधिकार दिला आहे. ठाणे जिल्हा हा राज्यातील सर्वाधिक मतदार संख्या असलेला जिल्हा असून, १८ विधानसभा मतदारसंघांतील प्रत्येक पात्र मतदाराने नोंदणी करणे आणि मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक आहे. सध्या राबविल्या जाणाऱ्या 'एसआर' (मतदार पुनरिक्षण) कार्यक्रम ांतर्गत जास्तीत जास्त युवकांनी आपली नावे नोंदवावीत. कलाकारांच्या माध्यमातून होणारी जनजागृती ही अधिक प्रभावी ठरते, म्हणूनच आज सिनेसृष्टीतील मान्यवर या मोहिमेत सहभागी झाले आहेत.

ते म्हणाले, लोकशाही म्हणून आपल्या देशातील स्थिरता वादातीत आहे. संपूर्ण जगासम ोर भारतीय लोकशाही एक सुदृढ लोकशाही म्हणून आदर्श आहे. संविधानाने लोकशाहीच्या माध्यमातून भारत देशातील प्रत्येक घटकाला अधिकाररुपी बळ दिले आहे. भारतात सर्वोच्च कुणीही नाही, सर्वोच्च आहे ती फक्त लोकशाही.

सिनेकलाकारांची उपस्थिती आणि जनजागृतीचा जागर...

या कार्यक्रमाला मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध लेखक व दिग्दर्शक हेमंत ढोमे, अभिनेत्री व निर्माती क्षिती जोग, अभिनेता अमेय वाघ आणि हरीश दुधाडे यांची विशेष उपस्थिती होती.

आधी मतदानाला जायाचं...मंग सहलीला जायाचं...!

-दिग्दर्शक लेखक हेमंत ढोमे

याप्रसंगी हेमंत ढोमे यांनी मतदानाच्या प्रक्रियेवर विश्वास ठेवण्याचे आवाहन करीत, आपल्या 'क्रांतीज्योती विद्यालय' चित्रपटाचा उल्लेख करून मराठी भाषेचा आणि कर्तव्याचा गौरव केला.

ते म्हणाले की, निवडणूक प्रक्रियेवर विश्वास ठेवण्यासाठी आधी स्वतःवर आणि या व्यवस्थेवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. मतदान करण्याचा मानसिक आनंद, समाधान वेगळेच असते. म्हणूनच राष्ट्रीय कर्तव्याची जाण ठेवून भारताला संपूर्ण विकसित राष्ट्र बनविण्यासाठी आपले सर्वांचे सक्रिय योगदान आवश्यक आहे. त्यामुळे मतदानाच्या दिवशी मिळणाऱ्या सुट्टीकडे केवळ मजा म्हणून न पाहता आधी मतदानाला जायाचं... मंग सहलीला जायाचं..! अशा शब्दात मतदारांना मतदान करण्यासाठी आवाहन केले.

मतदानाच्या अधिकाराकडे सकारात्मक व कर्तव्य भावनेने पाहणे गरजेचे

- ज्येष्ठ पत्रकार अरुण करमरकर

ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक अरुण करमरकर यांनी लोकशाहीतील मतदानाचे सांख्यिकीय महत्त्व आणि महिलांच्या सहभागावर आपले विचार मांडले. ते म्हणाले की, घटनाकाराने निर्माण केलेल्या व्यवस्थेच्या माध्यमातून आपल्या देशाची प्रतिष्ठा टिकविण्यासाठी, वृद्धिंगत करण्यासाठी आपण नेहमीच प्रयत्नशील राहायला हवे आणि त्यासाठी सर्वांनी सकारात्मक व कर्तव्य भावनेने निवडणुकीतील मतदानाच्या अधिकाराकडे पाहायला हवे. मतदानाच्या अधिकाराबरोबरच मतदानाचे कर्तव्य निभावणे, ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. आजच्या व्यवस्थेचे मूल्यमापन जरी आपल्या हातात असले तरी कर्तव्य म्हणून घटनेने दिलेला मतदानाचा अधिकार मात्र आपण नक्कीच वापरायला हवा.

निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने यांनी या लोकप्रिय कलाकारांच्या उपस्थितीमुळे मतदार जनजागृतीला वेग येईल, असा विश्वास व्यक्त केला.

गुणवंत अधिकारी व विद्यार्थ्यांचा गौरव...

याप्रसंगी निवडणूक प्रक्रियेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या बीएलओ, संगणक चालक आणि विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला, त्यांची नावे पुढीलप्रम ाणे...

विजेते विद्यार्थी:

चित्रकला स्पर्धा..

१) कु. दिव्या संतोष नारकर, प्रथम
२) कु. मोरे स्वराली शितल प्रविण, व्दितीय
३) कु. आर्या विनायक डिगे, तृतीय

निबंध स्पर्धा...

१) कु. शर्वरी शशिकांत बनसोडे, प्रथम
२) कु. गायत्री जाधव, व्दितीय
३) कु. मनाली संतोष शिरसाठ, तृतीय

उत्कृष्ट घोषवाक्य..

१) कु.आर्यन प्रज्ञेश सोढा, प्रथम
२) श्री.उमेश रघुनाथ गांगोडा, व्दितीय
३) श्रीम.लीना बल्लाळ, तृतीय

वक्तृत्व स्पर्धा..

१) कु.समेका प्रविण क्रांबळे, प्रथम
२) कु.अमृता दत्ता थोस्त, व्दितीय
३) कु.सई राजेश साळवी, तृतीय

नवीन मतदार ओळखपत्रांचे वाटप..

नवमतदार: साक्षी प्रमोद कापसे, कोमल प्रमोद कापसे, ईश्वर राव गुथुला, सोनम राधेश्याम चौधरी, श्रीकांत राजाराम घुले, युवराज पाटील, अभिजीत गौतम जाधव, करुणा रवी सोनावणे, रसिका गोपाळ राठोड, सादिया मो.आयु.खान, रेश्मा कुडेकर, यामिनी कुचलाहे यांना नवीन म तदार ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले.

उत्कृष्ट कर्मचारी सन्मान:

संगणक चालक समीर शेख, प्रमोद पगारे, केतन मोरे, शहीरा फिरोज अहमद अन्सारी.

विविध केंद्रांवरील बीएलओ व नाईक (शिपाई) यांचा सन्मान...

पंढरीनाथ चौधरी, सुखलाल परदेशी, निलेश नरवडे, राहुल हिंदुराव, विनीत पाचपांडे, गणेश राऊत, बळीराम वाघचौरे, प्रदीप पाटील, सलीम शेख, राजेंद्र गुप्ता, अरविंद माळी, इमरान आलमवाले, जितेंद्र कांबळे, राजेश गायकवाड, श्रुती टोळकर, गणेश सावंत, सविता कांबळे, अमित म्हात्रे व शिपाई संदेश बदले यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

महसूल सहाय्यक चांदपाशा शेख, परम ेश्वर जामदार, रामचंद्र जाधव तसेच निवडणूक नायब तहसिलदार मदन शेलार, डी.बी.चौधरी यांच्यासह सेवानिवृत्त नायब तहसिलदार प्रदीप मुकणे, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी श्रीम ती स्वाती घोंगडे आणि उपजिल्हाधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी सर्जेराव मस्के-पाटील व उर्मिला पाटील यांचा देखील मतदार नोंदणी उत्कृष्ट कार्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा संदेश तसेच मतदान जनजागृतीपर मैं भारत हू..! हे प्रोत्साहनात्मक गाणे उपस्थित मतदारांसाठी प्रसारित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना उप जिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने यांनी राष्ट्रीय मतदान दिवसाचे महत्त्व विषद केले, तर आभार प्रदर्शन तहसिलदार प्रदीप कुडाळ यांनी मानले.

या सोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ. तरुलता धानके यांनी केले. त्यांनी केलेल्या उत्कृष्ट सूत्रसंचलनासाठी त्यांचाही जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# भारतीय संविधान! प्रजासत्ताक भारत आणि आर्थिक न्याय

२६ जानेवारी १९५० प्रजासत्ताक दिनी ३९५ कलमे २२ प्रकरणे ९ परिशिष्टे असलेल्या भारतीय संविधानाचा अंमल सुरू झाला आणि देश सर्व प्रजेची सत्ता असणारा प्रजासत्ताक भारत बनला.

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. लोकांच्या.सामाजिक ,आर्थिक जीवनात रक्ताचा एक थेंबही न सांडता क्रांतीकारी परिवर्तने आणता येतील अशी शासन प्रणाली म्हणजे लोकशाही, अशी लोकशाही व्यवस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत होती. राजकीय स्वातंत्र्यासोबत सामाजिक न्याय , आर्थिक न्याय यासाठी त्यांनी स्वतंत्र संघर्ष उभा केला आणि त्यात ते यशस्वी झाले .निवडणूकीच्या आणि आरक्षणाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रक्ताचा एक थेंबही न सांडता राजकीय, सामाजिक, आणि आर्थिक क्रांती संविधानाच्या माध्यमातून केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बॅरिस्टर ही पदवी सोडली तर , सगळ्या पदव्या अर्थशास्त्रातील आहेत. ते जागतिक कीर्तीचे अर्थतज्ञ होते. एम .ए .साठी ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि अर्थनीती,पी.एचडी .साठी ब्रिटिश भारतातील प्रांतिक अर्थव्यवस्थेची उत्क्रांती,डी.एस्सी. साठी रूपयाचा प्रश्न त्याचा उगम व उपाय. १९२३ नंतर डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्रीय कोणताही ग्रंथ प्रकाशित केला नाही. त्यांनी केलेल्या सगळ्या चळवळी , घेतलेले निर्णय या प्रत्येकावर अर्थतज्ञ म्हणून एक वेगळा ठसा उमटलेला आहे. भारतीय संविधान हे त्याचे एक उत्तम उदाहरण आहे.

संपत्तीमुळे माणूस स्वावलंबी होतो ,प्राचीन काळी शूद्रांनी आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण होऊ नये हा मनुस्मृतीचा आदेश मानवाधिकार च्या विरोधी होता..

आर्थिक समतेशिवाय राजकीय स्वातंत्र्याला महत्त्व उरणार नाही. कारण सुरक्षा व संरक्षणाची हमी देणारे आर्थिक स्वातंत्र्य नसेल. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत आर्थिक न्यायाचे तत्व देताना देशाच्या विकासात सत्ता व शासनात भागीदारी देण्यासाठी अनुसूचित. जाती. अनुसूचित जमाती. इतर मागासवर्गीय समाजाची शिफारस केली आहे. जोपर्यंत शासन प्रशासनात या वर्गाचे प्रमाण वाढेल तेव्हाच आर्थिक समानता निर्माण करणे शक्य आहे.

शूद्र (ओ. बी.सी.) अतिशूद्र ( अनु. जाती. अनु. जमाती.) आदिवासी, महिला आणि सवर्ण समाज हे राजकारणात समान आधिकारी होतील , तेव्हा चातुर्वर्ण्य जन्य विषम ता आपोआप धुळीस मिळेल. म ागासवर्गीयांच्या जीवनात सांविधानिक रितीने सामाजिक आणि आर्थिक क्रांती घडवून आणण्यासाठी आरक्षणाशिवाय दुसरे कोणते माध्यम होते? हे संविधान सभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ठासून सांगितले.

पहिली गोलमेज परिषद ही भारताच्या संविधानाविषयी विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली होती.या गोलमेज परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षण धोरणाचा जोरदार पुरस्कार केला.मागासवर्गीय च्या गुलामीचा संबंध भारताच्या भावी स्वातंत्र्याशी ,संविधानाशी जोडला. समान नागरिकत्व ,मूलभूत अधिकार, अन्याय अत्याचारापासून मुक्तता, भेदभावा विरुद्ध संरक्षण सर्व मागास जाती जमातींना विधानमंळाध्ये ,नोक-या मध्ये पुरेसे प्रतिनिधित्व करण्यात यावे अशा मागण्याचा जोरदार पुरस्कार केला. गोलमेज परिषदेत भारताच्या स्वातंत्र्याच्या मागणी .सोबत१६ जानेवारी १९३१ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, देशातील एखादी नोकरी एकाच जातीची मिरासदारी होऊन बसली तर देशाच्या सार्वजनिक जीवनात धोका होऊन बसेल मला वाटते, अत्यंत महत्त्वाचे म्हणजे गोलमेज परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य वर्गाकरिताच आरक्षण मागितले नाही तर उच्च वर्गीयांची मक्तेदारी संपवून म ागासवर्गीय जातींना योग्य व समाधानकारक वाटा देण्याची मागणी केली.

संविधान निर्मितीच्या काळात आरक्षणावरून तुफान वादळ उठले होते, पण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समर्थ लेखणीने व अभ्यासपूर्ण पूर्ण वाणीने त्यांना प्रति उत्तर दिले. बहिष्कृत भारत या वृत्तपत्रात समतेसाठीच विषमता या लेखात म्हणतात समता वाद्यांचे ध्येय सर्वांना समतेने वागवून चालणे शक्य नाही, जेथे सर्व व्यक्ती समान आहेत तेथे काही व्यक्तींना असमानतेने वागविल्यास विषमता उत्पन्न होईल. पण जेथे व्यक्ती असमान आहेत तेथे त्यांना सारखे लेखून चालणे म्हणजे समता प्रस्थापनेच्या ध्येयाला विरोध करणे होय.

सामाजिक न्याय इतकाच आर्थिक न्यायाचा लढा तेवढाच महत्त्वाचा आहे. भारतीय संविधानात लोकशाही एक राजकीय व्यवस्था म्हणून स्वीकारली असली तरी,आपले ध्येय आर्थिक लोकशाहीचे आहे. असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मार्गदर्शक तत्वाच्या चर्चे चा समारोप करताना संविधान सभेत निक्षून सांगितले. भारतीय समाज व्यवस्था हे सामाजिक दृष्टीने विषमतेचे माहेर घर आहे ..विषम समाज रचनेत समानता प्रस्थापित करण्यासाठी प्रतिनिधित्वाचा म्हणजेच आरक्षणाचा हक्क हाच खरा सम तेचा हक्क होऊ शकतो.

भारतीय संविधानामध्ये अनुसूचित जाती ,अनुसूचित जमाती , शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेला वर्ग (ओबीसी) यांना शासकीय सेवांमध्ये आरक्षण दिलेले आहे कलम १५(२) १५ (३)१५ (४)१५ (५) १६(१) १६(४) १६४(क)१६४(ख)३०(१)४६ ३३५, ३३६ ,३४०, ३४१, ३४२. या कलमाम ध्ये सामाजिक आरक्षण प्रदान करण्यात आले आहे.

विशेष समांतर आरक्षण महिला,माजी सैनिक ,अपंग,प्रकल्प ग्रस्त, भूकंपग्रस्त, आंतरराष्ट्रीय खेळाडू यांच्यासाठी करण्यात आली आहे.

आर्थिक न्याय अर्थात आर्थिक लोकशाहीच्या संदर्भात २२ नोव्हेंबर १९४८ रोजी संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात .जे लोक सरकार बनविणार आहेत त्याच्या पुढे भारतीय संविधान एक आदर्श ठेवू इच्छिते हा आदर्श आर्थिक लोकशाहीचा आहे.

सामाजिक न्याय ,आर्थिक न्याय यांचे प्रतीक म्हणजे भारताचे संविधान आहे,संविधान हा राष्ट्र निर्मितीचा, देशाच्या संपन्नतेचा ,समृद्धीचा राष्ट्रीय ग्रंथ आहे.

**लेखक**
**भिमराव जयवंत गाडे**
**९२७३५७४४३१**

## स्त्री आधार केंद्रातर्फे महिलांसह पुरुषांसाठी कायद्याचे प्रशिक्षण लवकरच - उपसभापती डॉ.गोऱ्हे
## 'पिढी समानता आणि महिला सक्षमीकरण' विषयावर परिसंवादाचे आयोजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, पुणे :** कौटुंबिक हिंसाचार विरोधी दिनानिमित्त स्त्री आधार केंद्रातर्फे 'पिढी समानता आणि महिला सक्षमीकरण' या विषयावर दि.२४ रोजी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रम ात विधानपरिषदेच्या उपसभापती तथा स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्षा डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, कायद्याचे प्रशिक्षण फक्त महिलांसाठीच नव्हे तर पुरुषांसाठीही आवश्यक आहे. पुरुषांचाही यात सक्रिय सहभाग असावा. लवकरच किमान तीन ठिकाणी असे प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार आहेत.

याशिवाय प्रत्येक शाळेतील स्कूल बसमध्ये परिचारिका नेमण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी स्त्री आधार केंद्राकडून शाळांना पत्र पाठवले जाणार आहे. गुड टच आणि बॅड टचबाबत जागृती कार्यशाळाही घेण्यात येणार आहेत.

स्त्री आधार केंद्रातर्फे महिलांसाठी विधानभवन पाहणी दौराही लवकरच आयोजित केला जाणार असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. कार्यक्रमा दरम्यान आरोग्य विषयावरही खुली चर्चा झाली. महिलांची सुरक्षितता, सक्षमीकरण आणि समुपदेशन या विषयांवरही लवकरच चर्चासत्रे आयोजित केली जाणार आहेत.




"Transform Her' या महिला उद्योजक गटातील महिला उद्योजकांनी ही या परिसंवादात सहभाग घेतला. कार्यक्रमात विधानपरिषदेच्या उपसभापती तथा स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्षा डॉ. नीलम गोऱ्हे, स्त्री आधार केंद्राच्या विश्वस्त जेहलम जोशी, अपर्णा पाठक, आश्लेषा खंडागळे, अनिता शिंदे, नुकत्याच झालेल्या पुणे महानगरपालिका नगरसेविका पदाच्या उमेदवार वैष्णवी किराड, सायली पवार, सोनाली लांडगे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## राष्ट्रीय मतदार दिन पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, पुणे :** लोकशाही ही केवळ राज्यघटनेतील संकल्पना नसून ती प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन आचरणातून जिवंत राहते. मतदानाचा अधिकार हा केवळ हक्क नसून तो प्रत्येक नागरिकाचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. युवकांनी विशेषतः मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, लोकशाही म ूल्यांची जपणूक करावी आणि संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्याची जबाबदारीने कदर करावी, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत यांनी केले.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात आयोजित कार्यक्रम ात मतदार नोंदणी व निवडणूक प्रक्रियेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, प्रम ुख पाहुणे मेजर अर्चिस सबनीस, विंग कमांडर वैष्णवी टोकेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी 'उत्कृष्ट मतदार नोंदणी अधिकारी - २०२६' हा पुरस्कार पिंपरी विधानसभा मतदारसंघातील श्रीमती अर्चना यादव-पोळ यांना प्रदान करण्यात आला. तसेच 'उत्कृष्ट सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी' म्हणून जुन्नर विधानसभा मतदारसंघातील सुनील शेळके यांचा सन्मान करण्यात आला. निवडणूक नायब तहसीलदार प्रवर्गात आंबेगाव येथील सचिन वाघ आणि शिवाजीनगर येथील श्रीम ती सायली धस यांना पुरस्कार देण्यात आला, तर निवडणूक लिपीक प्रवर्गात शिवाजीनगर येथील श्रीमती अर्चना सानप यांना गौरविण्यात आले.

मतदारसंघनिहाय उत्कृष्ट पर्यवेक्षक पुरस्कारही यावेळी प्रदान करण्यात आले.

यामध्ये जुन्नर येथील राजेंद्र अडसरे, आंबेगावचेसागर सूर्यकांत गुरव, खेडचे अनिल बोऱ्हाडे, शिरूरचे एकनाथ देवीचंद ओव्हाळ, इंदापूरचे लक्ष्मीकांत शिवाजी मुळे, बारामतीचे संतोष रामचंद्र नलवडे, पुरंदरच्या अरूणा दत्तात्रय खेडेकर, भोरचे युनूस अब्दुल शेख, भोर-मुळशीचे लवा बाबा गायकवाड, मावळच्या एम.एफ.खान, चिंचवडचे महेंद्र ज्ञानोबा पवार, पिंपरीचे राजेंद्र रामचंद्र कांगुडे, भोसरीच्या मंगल जाधव, वडगावशेरीच्या सोनल मंगेश बोऱ्हाडे, शिवाजीनगरच्या लता दामसे, कोथरुडचे दीपक कंधारे, खडकवासल्याचे रवी फनसे, पर्वतीच्या स्नेहल श्याम साखरे, हडपसरचे अजय सिन्नरकर, पुणे कॅन्टोन्मेंटचे डॉ.म ोहम्मद जमीर अहमद चाँद शेख आणि कसबा पेठ मतदारसंघातील सौरभ मोरे यांचा समावेश होता.

## थोडक्यात बातम्या

## पंचगंगा शुगर अँड पॉवर तर्फे ऊस तोडणी कामगारांना पिंपरी अवघड येथे साखर वाटप



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, राहुरी (अहिल्यानगर) :** मकर संक्रांतीच्या पावन पर्वानिमित्त पंचगंगा शुगर अँड पॉवर प्रायव्हेट लिमिटेड, महालगाव यांच्या वतीने राहुरी तालुक्यातील पिंप्री अवघड येथे ऊस तोडणी काम गारांना साखर वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. या सामाजिक उपक्रमामुळे ऊस तोडणी कामगारांमध्ये आनंद व समाधानाचे वातावरण निर्माण झाले. पंचगंगा शुगर अँड पॉवर हा साखर कारखाना चेअरमन प्रभाकरजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असून, शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत पारदर्शक वजनकाटा, वेळेवर ऊस बिलांचे भुगतान तसेच शेतकरी हिताचे निर्णय यामुळे अल्पावधीतच हा कारखाना शेतकऱ्यांच्या विशेष पसंतीस उतरला आहे. शेतकरी व कामगार यांच्याशी आपुलकीचे नाते जपण्यावर कारखान्याचे व्यवस्थापन सातत्याने भर देत आहे. मकर संक्रांतीनिमित्त ऊस तोडणी कामगारांच्या सन्मानार्थ साखर वाटपाचा उपक्रम राबवून पंचगंगा शुगर अँड पॉवरने आपली सामाजिक बांधिलकी जपली असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले. या कार्यक्रमास पंचगंगा शुगर अँड पॉवरचे अभियंता नितेश लांबे, ॲग्री ओव्हरसीस सुनील माने, अमोल तारडे, प्रगतशील शेतकरी रामकिसन लांबे, बाबासाहेब बाचकर, गणेश लांबे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी पंचगंगा शुगर अँड पॉवरच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत अशा सामाजिक उपक्रमांचा आवाका अधिक वाढवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## पद्मश्री सन्मानित शंकर महादेवन यांच्या सुरांनी सजला नवी मुंबईचा सांस्कृतिक कला क्रीडा महोत्सव




**अक्षराज : गणेश भवार**

**दि.२५, नवी मुंबई :** पद्मश्री सन्मानित, सुप्रसिद्ध गायक शंकर महादेवन यांच्या सुरेल आवाजाने नवी मुंबई सांस्कृतिक कला क्रीडा महोत्सव २०२६ अंतर्गत आयोजित रंगनिषाद निर्मित स्वरयात्रा या भव्य संगीत सोहळ्याला अविस्मरणीय उंची मिळाली. आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली आणि उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमात शंकर महादेवन यांच्या गाण्यांनी संपूर्ण मैदान मंत्रमुग्ध झाले.

शास्त्रीय संगीताचा गाभा, सुगमतेची मधुरता आणि भावनांची खोल अनुभूती यांचा सुरेल मिलाफ त्यांच्या प्रत्येक गीतातून अनुभवायला मिळाला. त्यांच्या दमदार आणि भावस्पर्शी सादरीकरणाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. एकामागून एक सादर होत गेलेली हिंदी व मराठी सदाबहार गीते ऐकताना प्रेक्षक अक्षरशः संगीताच्या प्रवाहात वाहून गेले. संगीतप्रेमींनी दिलेली उस्फूर्त दाद ही त्यांच्या कलेप्रती असलेल्या अपार प्रेमाची साक्ष होती. या संगीत मैफिलीतून कला, संस्कृती आणि संगीताचा खरा आत्मा अनुभवता आला. हा संगीत सोहळा शंकर महादेवन यांच्या सुरेल गायनामुळे उपस्थित सर्व रसिकांच्या मनात कायमचा ठसा उमटवून गेला आणि नवी मुंबईच्या सांस्कृतिक इतिहासात एक अविस्मरणीय पर्व ठरला.

## संस्काराची उत्तम पिढी घडविण्याचे काम महिलाच करू शकतात - दरबस्तेवार




**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२५, कुंडलवाडी (नांदेड) :** घरातील लहान लहान बालकावर संस्काराची उत्तम पिढी घडविण्याचे काम हे फक्त आमच्या महिला भगिनीच करू शकतात असे स्पष्ट प्रतिपादन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हज्जापूर येथील सहशिक्षिका निता सुभाष दरबस्तेवार यांनी केले. ते पानसरे महाविद्यालय अर्जापूर व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरणाळी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या महिला सक्षमीकरण व हळदी कुंकू मिलन कार्यक्रमात कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक शेख साजिद हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र कुंडलवाडी च्या समूह आरोग्य अधिकारी डॉ. रुबिया पठाण, पानसरे महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. पी. बी. शिंदे, प्रा.डॉ.एस.एच.मरकले, शाळेचे सहशिक्षक सायन्ना गुडलावार यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. पानसरे महाविद्यालय अर्जापूर यांचे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर दिनांक २२ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६ पर्यंत येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजन केले आहे. या कार्यक्रमाचे औचित्य साधून पानसरे महाविद्यालय अर्जापूर व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरनाळी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी महिला सक्षमीकरण व हळदी कुंकू मिलन हा कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात पुढे बोलताना निता दरबस्तेवार म्हणाल्या की, आपल्या समाजात बालकावर संस्काराची उत्तम पिढी घडविण्यासाठी महिला भगिनी या संस्कृती संवर्धन करण्याचे काम करू शकतात. महिला भगिनी घरात व समाजात वावरताना आपली संस्कृती टिकवून संवर्धन करण्याचे काम करावे. त्यातल्या त्यात महिलांनी आपल्या दैनंदिन कामातून थोडा वेळ काढून तो वेळ आपल्या परिवारातील बालकांना देऊन त्यातून त्या बालकांना उत्तम चारित्र्यवान बनवावे.